वाचून :- १) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत भरती प्रक्रियाबाबतची जाहिरात दि. २७-१२-२०२१

२) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अंतिम कागदपत्र पडताळणी दि. ०९/०५/२०२२ ते दि. १४/०५/२०२२

३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुर टिपणी दि. १० / १० /२०२२

---

जा.क्र/आरोग्य/आस्था/नियुक्ती/४९५/२२
राष्ट्रीय आरोग्य अभियान,जि.प. सातारा
दि:- १२/१० /२०२२

# विविध पदाचे कंत्राटी नियुक्ती आदेश

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पदभरती प्रक्रिया सन २०२२-२३ अंतर्गत निव्वळ कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपात खालील अधिकारी व कर्मचारी यांना दि. ११ / ११ /२०२२ ते दि १० / १० /२०२३ पर्यंत नियुक्ती आदेश देणेत येत आहे.

| Sr. No | Candidate Name | Post Name | Original Category | Selection Category | नियुक्तीचे ठिकाण | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | BAWKAR SHRUTI PRAVIN | NBSU Staff Nurse | SBC | SBC | RH Undale | Rs.20000/- |
| 2 | VIJAYA KONDIBA SHINDE | NUHM Staff Nurse | Open | Open | NUHM Karad | Rs.20000/- |
| 3 | DHAYGUDE PRIYANKA NANA | IPHS Staff Nurse | Open | Open | PHC Kale | Rs.20000/- |
| 4 | PHARANDE ADITYA ANIL | SNCU Staff Nurse | OBC | OBC | SDH Karad | Rs.20000/- |
| 5 | NAVALE RESHMA GANESH | Suman Staff Nurse | OBC | OBC | PHC Shirwal | Rs.20000/- |
| 6 | Vrushali Baban Pawar | Physiotherapist | SC | Against Reservation | DH Satara | Rs.20000/- |
| 7 | SHINDE KALMESH BABURAO | X-Ray Technician | ST | ST | DH Satara | Rs.17000/- |
| 8 | GAIKWAD SUMIT DAYANAND | Medical Officer UG RBSK- Male | Against Reservation | Against Reservation | RH Koregaon | Rs.28000/- |
| 9 | JADHAV PRERANA SHRIRANG | Medical Officer UG RBSK- Female | EWS | EWS | RH Dahiwadi | Rs.28000/- |
| 10 | AISHWARYA SURESH BHOSALE | Medical Officer UG RBSK- Female | Against Reservation | Against Reservation | RH Medha | Rs.28000/- |

अटी व शर्ती:-

- राष्ट्रीय आरोग्य अभियान, जि.प. सातारा मुख्य कार्यालयाकडून पारित केलेले आदेश (नियुक्ती, पुनर्नियुक्ती, बदली आदेश) सर्व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांना लागू राहतील. नियुक्ती आदेश प्राप्त होताच ७ दिवसांच्या आत हजर होणे बंधनकारक आहे.

- नियुक्ती आदेश या कार्यालयाकडून ज्या अधिकारी/कर्मचारी यांना देणेत आलेली आहे त्या अधिकारी/कर्मचारी यांची बदली किंवा प्रतिनियुक्ती इतर कोणत्याही विभागात किंवा त्याच विभागात करता येणार नाही.
- या कार्यालयाकडुन देणेत आलेला नियुक्ती आदेश किंवा पुनर्नियुक्ती आदेशाने नेमणुक करणेत आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना राजीनामा द्यावयाचा असेल तर जिल्हा कार्यालयाकडुन राजीनामा मंजुर होईपर्यंत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना संस्था स्तरावरुन कार्यमुक्त करता येणार नाही. कर्मचारी कार्यमुक्तीचे आदेश एनएचएम जिल्हा कार्यालयाकडुन मा. मु.का.अ. यांची मंजुरी घेतलेनंतर निर्गमित करणेत येतील.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करीत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आपला स्वत:चा मोबाईल फोन २४ तास जिल्हा कार्यालयाशी संपर्कात ठेवावा लागेल.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्येक आर्थिक वर्षात एकुण २० रजा मंजुर करणेत आलेले आहेत. सदर रजा दि.१ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधी पर्यंत असतील तसेच अतिगंभीर (TB, Cancer, Orgen Trasplant etc) ३ महिने करिता रजा मंजुर करणेत आलेल्या आहेत व महिला कर्मचारी यांचेसाठी प्रसुती रजा ६ महिने कालावधीसाठी मंजूर आहे.
- सुट्टीच्या दिवशी कार्यालयाचे काम केले असल्यास त्यासाठी बदली सुट्टी मंजुर नाही.
- कार्यालयाची वेळ सकाळी ०९.४५ ते ०६.१५ पर्यंत राहील. वैद्यकिय सेवा पुरविणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यालयीन वेळ ओपीडी/आयपीडी तासाप्रमाणे राहील.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी नियुक्ती कालावधी संपणेपुर्वी १ महिना अगोदर पुनर्नियुक्ती प्रस्ताव जिल्हा कार्यालयाकडील पत्र मिळालेनंतर मुदतीत सादर करावा. पुनर्नियुक्ती प्रस्ताव वेळेत सादर न केलेस संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पुढील कालावधीसाठी नियुक्तीची आवश्यकता नाही असे समजुन संबंधितांना कामावरुन कमी केले जाईल.
- सदरची नेमणुक तात्पुरत्या स्वरुपाची असुन कंत्राटी कालावधी संपल्यानंतर संबंधित पदावरील आपली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल यासाठी आपणांस कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना व कारण न देता कमी करण्याचा हक्क जिल्हास्तरावर राखुन ठेवलेला आहे.
- उमेदवारास त्यागपत्र/राजीनामा द्यावयाचे झाल्यास १ महिन्याची आगाऊ नोटीस अथवा १ महिन्याचे मानधन रोख भरावे लागेल. सदरची नेमणुक चांगल्या वर्तणुकीवर अवलंबुन राहील.
- वार्षिक कामाचे अहवालावरुन मुल्यमापन केले जाईल, काम असमाधानकारक आढळल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता कामावरुन कमी करणेत येईल.
- केंद्र शासनाने एखादे पद नामंजुर केल्यास त्या पदावर नेमणुक करणेत आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येतील.

- दि. ११ / ११ /२०२२ ते दि.१० /१० /२०२३ या कालावधीची पुनर्नियुक्ती प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२२- २३ च्या अधीन राहुन देणेत येत आहे. केंद्र शासनाने सन २०२१-२२ करीता कोणत्याही पदास मान्यता दिली नाही अथवा भविष्यात इतर कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उदभवल्यास सदर पदावरील कर्मचा-यांची सेवा कोणतीही पूर्वसुचना व कोणतेही कारण न देता तात्काळ संपुष्टात आणली जाईल.
- मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या संदर्भ क्र ३ च्या पत्रानुसार एनएचएम अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या पदस्थापनेत बदल करण्याबाबतचे कोणतेही अर्ज अथवा शिफारस जिल्हा आरोग्य सोसायटीस सादर करु नयेत, तसे अर्ज प्राप्त झालेस त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
- करारपत्रात मुद्दा क्रं 8.C VI नुसार जर एखादा कंत्राटी अधिकारी/कर्मचारी ३ महिने विनापरवानगी रजेवर/गैरहजर असल्यास त्याची सेवा समाप्त होईल अशी नविन अट समाविष्ट करण्यात आली आहे. सदर अटीनुसार वैद्यकिय अधिक्षक सर्व व वैद्यकिय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र सर्व यांनी अशा कर्मचाऱ्यांचे सेवासमाप्त करणेचे प्रस्ताव जिल्हास्तरावर जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, एनएचएम यांचेकडे सादर करावेत.
- अभियानांतर्गत विविध स्तरावर पदभरती करण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असुन ही नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प संपुष्टात येईपर्यंत किंवा करारपत्र कालावधी समाप्ती नंतर संपुष्टात येईल.

विनय गौडा जी.सी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सातारा

प्रति,
नियुक्ती देणेत आलेले वरील सर्व अधिकारी/कर्मचारी

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय सातारा
२) अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय सातारा
३) निवासी वैद्यकिय अधिकारी (बाहयसंपर्क), जिल्हा रुग्णालय सातारा
४) वैद्यकिय अधिक्षक, उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालय ........संबंधित
५) मुख्याधिकारी, नगरपालीका.........................संबंधित
६) तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती............ संबंधित
७) वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र .................... संबंधित